केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५
अपिलीय प्राधिकारी, शासकीय जन माहिती अधिकारी व
सहायक जन माहिती अधिकारी यांचे नियुक्तीबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय, क्रमांक : रवका २००६/प्र.क्र.११८/का-९
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : २८ जून, २००६

पहा :- १) शासन आदेश, म.व बा.वि.वि., क्रमांक- रवका २००५/प्र.क्र.१३०/का-९, दिनांक ३० सप्टेंबर, २००५
२) शासन निर्णय, म.व बा.वि.वि.,क्रमांक- रवका २००५/प्र.क्र.१३०/का-९, दिनांक १४ नोव्हेंबर, २००५
३) सामान्य प्रशासन विभाग, पत्र क्रमांक :- भमाअ २००५/प्र.क्र.१९०/०५/५, दिनांक २०.१२.२००५

**शासन निर्णय** :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम -५ (१)(२) नुसार महिला व बाल विकास विभाग, (मंत्रालयांतर्गत) नविन प्रशासन भवन, ३ रा मजला येथील संदर्भाधीन क्र.१, दि. ३०.९.०५ व क्र.२, दि. १४.११.२००५ चे आदेश / शासन निर्णय रद्द करुन महिला व बाल विकास विभाग (खुद्द) मधील खालीलप्रमाणे नमूद केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना शासनाचे शासकीय जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | शासकीय जन माहिती अधिकारी (नांव व पदनाम) | शासकीय जन माहिती अधिकारी म्हणून सोपविलेली संबंधित कार्यासने | अपिलीय प्राधिकारी (नाव व पदनाम) | अपिलीय प्राधिकारी म्हणून विभागातील सोपविलेली कार्यासने |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. य. रा. गायकवाड, अवर सचिव | कार्यासन - ८ | श्रीमती वै. अ. पारकर, उप सचिव | कार्यासने - १,४,५,६,७ व ८ |
| २. | श्रीमती प्र. प्र. चिटणीस, अवर सचिव | कार्यासन - ६ | | |
| ३. | श्री. का. गो. वळवी, कक्ष अधिकारी | कार्यासन - १ | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | श्री. शशांक सावंत, कक्ष अधिकारी (अति.कार्यभार) | कार्यासन - ४ | | |
| ५. | श्री. प्र. ना. वळवी, कक्ष अधिकारी | कार्यासन - ५ | | |
| ६. | श्री. मो. कृ. कदम, कक्ष अधिकारी | कार्यासन - ७ | | |
| ७. | श्रीमती नी. सु. रानडे, कक्ष अधिकारी | कार्यासन -२ | श्री. श. पा. वारे, उप सचिव | कार्यासन २, ३, ९ व १० |
| ८. | श्रीमती चा. दे. चौधरी, कक्ष अधिकारी | कार्यासन - ३ | | |
| ९. | श्री. जयंत जनबंधु, कक्ष अधिकारी | कार्यासन - ९ | | |
| १०. | श्री. ग. रा. देशमुख, कक्ष अधिकारी (अतिरिक्त कार्यभार) | कार्यासन - १० | | |

२. तसेच संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक २०.१२.२००५ च्या पत्रात नमूद केल्यानुसार नोंदणी शाखेत प्राप्त होणाऱ्या सर्व अर्जांची नोंद करण्याचे व ते कोणाकडे व केव्हा पाठविले याची स्वतंत्र नोंदवही ठेवण्याकरिता या विभागात नोंदणी शाखेतील श्री. शिरीष माने, व श्री. विनोद पगारे, लिपिक यांची "सहायक जन माहिती अधिकारी" म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. श्री. शिरीष माने, व श्री. विनोद पगारे, सहायक जन माहिती अधिकारी यांनी केंद्र शासनाच्या माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त होणारे सर्व अर्ज /अपील अर्ज स्विकारुन त्यांची सविस्तर नोंद करण्याचे व ते अर्ज कोणाकडे व केव्हा पाठविले त्याची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवावी. तसेच सदर अर्ज, विषयाशी संबंधित असलेल्या कार्यासनांकडे विहित मुदतीत पाठवावेत.

३. वरीलप्रमाणे "सहाय्यक जन माहिती अधिकारी, शासकीय जन माहिती अधिकारी आणि अपिलीय प्राधिकारी" यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या कार्यासनांच्या पर्यवेक्षी कार्यभारात बदल करण्यात आल्यास व त्यांचे ठिकाणी नव्याने नियुक्त करण्यात आलेले अधिकारी संबंधित कार्यासनाचे "सहाय्यक जन माहिती अधिकारी, शासकीय जन माहिती अधिकारी आणि अपिलीय प्राधिकारी" म्हणून कामकाज पाहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(श. पा. वारे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिवालय, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्री, यांचे खाजगी सचिव
सर्व राज्यमंत्री, यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव, यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांचे स्वीय सहायक, नवीन प्रशासन भवन, १३ वा मजला, मंत्रालय, मुंबई.
मा.महासंचालक, माहिती व जनसंपर्क कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
संचालक, माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय (विधानसभा)/(विधानपरिषद) विधानभवन, मुंबई
राज्य निवडणूक आयुक्त, नवीन प्रशासन भवन, मुंबई
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्रालयीन विभाग
आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई
व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व)मुंबई-५१
सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग गृहनिर्माण भवन, बांद्रा (पूर्व) मुंबई ५१
सचिव, महाराष्ट्र राज्य समाजकल्याण सल्लागार बोर्ड, चेंबूर, मुंबई
सचिव, महिला व बाल विकास विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
श्रीमती वै.अ.पारकर, उपसचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
नोंदणी शाखा, संबंधित कर्मचारी (सर्व)
निवड नस्ती, का-९